४. वर्षा-श्रावण, भाद्रपद ५. शरद-आश्विन, कार्तिक ६. हेमंत-मार्गशीर्ष, पौष.

आपला भारत देश विषुववृत्ताच्या जवळ उष्ण कटिबंधात येतो. शिशिर, वसंत व ग्रीष्म ह्या तीन ऋतूस उत्तरायण आदानकाल म्हणतात. अयन म्हणजे गमन, सूर्य ह्या उत्तरायणात विषुववृत्ताच्या उत्तरेकडील भागातून संचार करीत असतो. त्यामुळे सूर्य व वारा ह्या काळात तीव्र, रुक्ष व उष्ण गुणाचे असतात. त्यामुळे मनुष्याची शक्ती आकर्षण करुन घेतली जाते. कमी होते. अग्नी प्राबल्यामुळे सौम्य गुण नष्ट होतात. कडू, तुरट व तिखट रस बलवान होतात.

सध्या वसंत ऋतु चालू असल्यामुळे ह्या ऋतुमधील आहार विहाराबद्दल थोडक्यात पाहू. आधीच्या हेमंत व शिशिर ऋतुमध्ये थंड हवा असते. शरीरात कफ साठलेला असतो. तो वसंत ऋतुमध्ये सुर्याच्या उष्णतेमुळे पातळ होतो. भुकेवर परिणाम होऊन ती कमी होते. त्यामुळे रोगोत्पत्तीस मदत होते.

त्यासाठी आधीच म्हणजे वसंत ऋतु सुरु झाल्याबरोबर उलटी होणारे औषध घेऊन कफ काढून टाकावा. नस्य म्हणजे नाकात औषध टाकून घ्यावे. म्हणजे डोक्यातील पण कफ बाहेर पडेल.


ह्यामुळे कफाचे प्रमाण कमी होईल. म्हणजेच तो पाहिजे त्याप्रमाणात राहील. कफाचे मुख्य स्थान आमाशय त्यामुळे कफ वाढून भुक मंदावते. अन्नाची इच्छा होत नाही. उलटी, मळमळणे इत्यादी लक्षणे दिसतात ते होणार नाही.

सर्दी, खोकला, ताप, दम लागणे, कंड सुटणे, काविळ इ. विकार होणार नाहीत. आळस, अपचन होणार नाही. कारण कफ हा स्निग्ध, बुळबुळीत व जड गुणाचा असतो. पण सुरुवातीलाच कफ काढून टाकल्यामुळे हे गुण वाढणार नाहीत. व मनुष्याची प्रकृति चांगली राहील.

ह्या दिवसात आहार हलका व रुक्ष असावा म्हणजेच पचनास जड, तेलकट, तुपकट, आंबट, गोड असे पदार्थ आहारात नसावेत. म्हणून लगेच जी हल्ली थंड पेये आईस्क्रीम, मिल्क-शेक, ज्युस वगैरे घेतली जातात ती टाळावीत नाहीतर उन्हाळा सुरु झाल्याबरोबर ह्यांचे सेवन सुरु करुन आपण रोगांना आमंत्रण देत असतो.

जुने धान्य भाजून मग खावे. सुंठ, नागरमोथा इ. पाण्यात तापवून थंड करुन पिण्यास वापरावे. मध पाणी प्यावे. स्नान करण्यास चंदन कापुरांनी सुवासिक केलेले थंड पाणी वापरावे. किंवा केशर चंदन इ. चे लेपन शरीराला करावे.

दिवसा झोप घेण्याचे टाळावे. अशक्य असल्यास आराम खुर्चीत बसल्या



वसल्या थोडा आराम करावा किंवा शक्य असेल तर विशेषत: दुपारची वेळ थं वारा आहे, भरपुर वृक्षाची छाया आहे, सुवासिक फुलझाडे आहेत, प्रसन्न वातावरण आहे अशा ठिकाणी घालवावी.

अशा तऱ्हेने आपण वसंत ऋतुमधील आहार विहार संक्षेपाने पाहिला. ह्याच प्रमाणे पुढील ऋतुमधील आहार विहार आपण पुढील लेखामध्ये पाहू.

## ''ॐ नमो भगवते साईनाथाय''

तूच साईनाथ, तूच गजानन
साईनाथ वसे, अवघ्या चराचरातून ॥१॥

तूच साईनाथ, तूच दत्तावतार
कुबेर धन असूनी जवळी, फिरे दारोदार ॥२॥

तूच साईनाथ, तूच गौरीशंकर
जिथे गेला साईनाथ, धन्य ते द्वार ॥३॥

तूच साईनाथ, तूच मनमोहन
ज्यांनी पाहिले साईनाथ, धन्य ते नयन ॥४॥

तूच साईनाथ, तूच पंढरीनाथ
तूच व्यंकटेश्वर, तूच अवघा ईश्वर ॥५॥

तूच सर्व तीर्थे, तूच सर्व धाम
धाव धाव साईनाथ, भेट देई लवकर ॥६॥

- कु. सरस्वती बालाजीराव बुलबुले
नांदेड.

# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ६ वा

**सटीक गद्य अनुवाद :**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.)

**- निवेदन -**

(आजपावेतो वाचकांनी श्री साईसत्चरितातील पाच अध्यायांचा सटीक अनुवाद वाचला. त्यात बरेच शब्द व वाक्ये कौंसात दिलेली आहेत, त्याचा खुलासा व हेतू मी खाली देत आहे :–

(१) मूळ पोथीतील संस्कृत किंवा अवघड शब्द व वाक्ये पुढे कौसात दिली आहेत. उदा. पलीकडला किनारा (पैलपारू) शेळीच्या गळ्याजवळील मांसल अवयवाप्रमाणे (अजागलस्तनकोटी). कित्येक वेळा ते संधी सोडून दिले आहेत. उदा. शिरडीला जाण्याच्या इच्छेची जागृती (शिरडी+गमन+इच्छा+उद्बोध) ब्रह्म व आत्मा यांचे ऐक्य (ब्रह्म+आत्मा+ऐक्य). हेतू हा की भक्तांना मूळ पोथीतील शब्दांची ओळख व्हावी आणि त्यांचा अर्थ त्यांनी नीट समजून घ्यावा. कारण माझा गद्य अनुवाद फक्त मूळ पोथी समजून घेण्यासाठी आहे. पारायणे व नित्य वाचन प्रासादिक मूळ पोथीचेच करावयाचे आहे. त्यावेळी ती अर्थ जाणून वाचता आली पाहिजे.

(२) नेहमीच्या प्रचारातला पोथीतला संस्कृत शब्द तसाच ठेवून त्याचा स्पष्टीकरणार्थ अर्थ पुढे कौसात सांगितला आहे. उदा. भालचंद्र (कपाळावर चंद्र शोभा देत असलेला) भग्नरदन (दात तुटलेला).

(३) अध्यात्मातले तांत्रिक शब्द पुढे कौंसात समजावून सांगितले आहेत. उदा. अद्वैत (जग व ब्रह्म किंवा जीवात्मा व परमात्मा हे भिन्न नाहीत; एकच आहेत, असे मत). पुराणातील किंवा वर्तमानकाळातील विशेषनामांबद्दल स्पष्टीकरण किंवा जास्त माहिती सांगितली आहे. उदा. मेरू पर्वत (हिमालयाच्या उत्तरेकडील भागात सप्त खंडांच्या मध्यभागी असलेला आणि अति श्रेष्ठ मानलेला पर्वत). प्रयाग (अलाहाबाद येथील गंगा व यमुना नद्यांच्या संगमावरील पवित्र क्षेत्र). आजच्या पिढीला चांगलेच माहीत असलेले परंतु नवीन पिढींच्या वापरण्यात किंवा परिचयाचे नसलेले शब्द मुद्दाम समजावून सांगितले आहेत. उदा. उखळ (धान्य कांडण्याकरिता दगड खोदून केलेला खोलगट भाग) मुरळी (खंडोबाला वाहिलेली स्त्री, किंवा देवदासी).

(४) समांतर विचाराच्या इतर अध्यायातील ओव्या किंवा गीता, उपनिषदासारख्या संस्कृत ग्रंथातील उतारे किंवा आख्यानेंसुद्धा प्रस्तुत अध्यायातील विचार किंवा तत्त्व नीट समजण्यासाठी विस्तृतपणे दिले आहेत. उदा. अ. २९ मधील 'शक्ति ही प्रचंड नामाची।' या १२९व्या ओवीच्या संबंधात पूर्वी अ. २७च्या २८५-८६ ओव्यांची म्हणजे 'नाम पापांचे पर्वत फोडी। नाम काळाची मान मोडी।' वगैरेंची आठवण करून दिली आहे. तसेच अध्याय ३२ मध्ये 'उर्ध्वमूळ संसारविटप' म्हणजे मुळे वर आकाशात असलेल्या संसारवृक्षाबद्दल कौंसात स्पष्टीकरण करताना गीतेतील अ. १५ तील श्लोक १ आणि कठोपनिषदातील अ. २ वल्ली ३ मंत्र १ उद्धृत केले आहेत. अध्याय १६ तील ओ. ७३ ''हिरण्यगर्भपदापर्यंत। सर्व उत्कर्षी जो विरक्त। तोचि ब्रह्मविद्येसी अधिकृत। अनासक्त इतरत्र।।'' या ओवीची टीका लिहीताना कठोपनिषदातील नचिकेत आणि बृहदारण्यक उपनिषदातील मैत्रेयी यांच्या कथा सांगून त्यांच्या प्रसिद्ध वचनांचे उतारे दिले आहेत.

(५) चालू अध्यायातील महत्त्वाच्या विषयाचे विस्तृत विवेचन करण्यासाठी तसेच अनेक अध्यायांत विखुरलेल्या एकाद्या विषयाचे एका जागी समालोचन करण्यासाठी काही अध्यायांच्या समाप्तीनंतर आणखी टीका जोडलेली आहे. उदा. अ. ४चे शेवटी साईबाबांच्या जन्माबद्दलचे विविध तर्क व मते घेऊन त्यांची सविस्तर चर्चा केली आहे. तसेच अ. ३५च्या शेवटी पूर्वीच्या अ. ३३ व ३४ मध्ये पसरलेली उदीबद्दलची सर्व माहिती एकत्र करून तिच्या गुणांचे व ती वापरण्याच्या पद्धतीचे एके ठिकाणी पर्यावलोकन केले आहे. असो.

अशाप्रकारे मी कौंसात ठिकठिकाणी काही शब्द व मजकूर दिलेला आहे. उद्देश हा की बाबांच्या कृपेने श्री साईसत्चरिताचा जो काही अर्थ मला समजला आहे तो परोपरीने समस्त साईभक्तांना समजावून सांगावा. त्यात साधे भोळे फार न शिकलेले भक्तही आले आणि अभ्यासू व जिज्ञासू सुशिक्षित भक्तही आले. कौंसातील भाग दुसऱ्या प्रकारच्या भक्तांसाठी आहे. पहिल्या प्रकारच्या भक्तांना तो क्लिष्ट व निरस वाटला तर त्यांनी तो सोडून द्यावा व कौंसाबाहेरचाच मजकूर वाचावा म्हणजे त्यांचे अनुसंधान कायम राहील.

माझी ही सेवा सर्वच भक्तांसाठी आहे. तेव्हा सर्वच भक्तांनी माझ्या सटीक अनुवादातील कौंसाच्या व त्यात दिलेल्या विस्तृत माहितीबद्दल प्रति कौंसाच्या व त्यात दिलेल्या विस्तृत माहितीबद्दल प्रतिक्रिया पत्राने किंवा समक्ष भेटून मला कळवाव्यात. या खेपेस वर माझा पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक दिलेला आहे. पद्धत आवडली नसल्यास तीही कोणती हे मोकळ्या मनाने कळवावे. व वाटल्यास काही

सूचनाही कराव्यात. साईकृपेने आजपर्यंत ३९ अध्याय लिहून पूर्ण झाले आहेत व ४० वा अध्याय चालू आहे. तरीपण वाचकांच्या मतांचा व सूचनांचा पूर्ण विचार करून त्यात जरूर तो बदल करण्याची माझी तयारी आहे. शेवटी ही सेवा आपणा भक्तांसाठीच आहे ना! तर कृपया प्रतिक्रिया कळवून सहकार्य करावे ही विनंती.

- अनुवादक)

पूर्वार्ध

"'रामजन्म-उत्सवादि कथनं''

(श्रीरामजन्म-उत्सव वगैरेंचे वर्णन)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

परमार्थाची इच्छा करणारा (परमार्थ) असो किंवा संसारात सर्व सुखसंपत्ती प्राप्त करण्याची इच्छा करणारा (संसारू) असो. (ज्या नावेचा) सद्गुरु नावाडी किंवा सुकाण्या (कर्णधारू) असेल तीच नाव (तारू) त्याला (परमार्थूला किंवा संसारूला) पलीकडच्या काठावर (पैलपारू) नेऊन उतरवील. सद्गुरु शब्दाने मनात भावना जागृत झाल्या (वृत्ति उठता) की श्री साईबाबांचीच आधी आठवण येते. ते समोरच येऊन उभे राहतात (उभेच ठाकती सन्मुखता) आणि आपला हात मस्तकावर ठेवतात. धुनीतील उदीसकट आशीर्वादयुक्त (बाबांचा) हात (वरदयुक्त हस्त) जेव्हा मस्तकावर पडतो तेव्हा अंतःकरण स्वानंदाने उचंबळून (उलूनि) येते आणि डोळ्यांतून प्रेम वाहू लागते (ओसंडत नेत्रांतुनी). गुरुंच्या हाताच्या स्पर्शाच्या कौशल्याचे (विंदान) किती आश्चर्य की जो प्रलयाग्नीतही (कल्पांताच्या वेळी होणाऱ्या जगाच्या अंताच्या आगीत देखील) जळत नाही (न होई दहन) त्या सूक्ष्म देहाला (लिंग देह ; वासनायुक्त शरीर : मन, बुद्धी, दहा इंद्रिये व पाच प्राण इतक्या सतरा तत्त्वांचा हा देह असतो हा जळला म्हणजे त्या जीवाला पुनर्जन्म नसतो) आपल्या हस्तस्पर्शाने जाळून भस्म (ज्वलन भस्मीभवन) करून टाकतो. देवाच्या कथावार्ता चुकून निघाल्या तर ज्यांच्या डोक्याला तिडीक उठते (वेदना होतात) किंवा ज्यांच्या तोंडाची बेताल (ताळतंत्राशिवायची) वटवट चालू होते (वाचा प्रवाहे बाष्कळता) त्यांनाही स्थिरता (शांती) लाभते. (बाबांनी) डोक्यावर त्यांचा कमळरूपी हस्त ठेवताच अनेक जन्मांची पूर्ण पिकलेली म्हणजे फळ देण्यायोग्य तयार झालेली पापे (परिपक्व मल) धुऊन जाऊन साईंचे प्रेमळ भक्त निर्मळ (पावन) होतात. बाबांचे ते देखणे (गोमटे) रूप पाहून कंठ अत्यंत आनंदाने

दाटतो, डोळ्यांना आनंदाचा पाझर फुटतो आणि हृदयांत अष्टभाव (आठ प्रकारच्या मनाच्या अवस्था, घाम सुटणे, स्तब्ध होणे, अंगावर रोमांच उभा राहणे, आवाज बिघडणे, शरीराला कंप सुटणे, शरीराचा रंग पालटणे, डोळ्यातून अश्रू वाहणे आणि शुद्ध हरपणे) प्रकट होतात. मी तोच (परमेश्वर) आहे (सोऽहं) अशी वृत्ती जागविली जाते, स्वानंदाला प्रकट केलं जाते आणि मी तूं पणा जागच्या जागीच जिरविला जाऊन (ठायीच विरवीत) ऐक्यतेने (सामरस्यें) अद्वैत मताचा (जीव व परमेश्वर किंवा जगत व ब्रह्म एकच आहे असे मत) दिमाख दाखविला जातो. पोथी पुराण वाचू जाता पावलोपावली सद्गुरुंचे स्मरण होते, राम किंवा कृष्णाच्या रूपाने साईबाबाच नटतात आणि आपले चरित्र ऐकवितात (असे वाटते). एकनाथी भागवत (श्रीमद् भागवत पुराणाच्या ११व्या स्कंधावर श्रीक्षेत्र पैठण येथे होऊन गेलेले महासाधू श्री एकनाथ महाराज यांनी लिहीलेली ओवीबद्ध मराठी टीका) ऐकण्यास बसले असता (परिसूं बैसतां) साईच नखशिखान्त (पायाच्या नखापासून शेंडीच्या टोकापर्यंत) श्रीकृष्ण होऊन भक्तांचे हित साधण्यासाठी उद्धवगीत (श्रीकृष्णाने यादव कुळातील आपला सखा व मंत्री उद्धव याला अवतार समाप्तीच्या आधी केलेला उपदेश) गात आहे (असे वाटते). सहज गोष्टी करायला बसले असता तेथेही योग्य दृष्टांत (प्रत्यक्ष अनुभवाचे उदाहरण) देण्यासाठी अचानक श्री साईनाथांचीच कथा आठवते. कागद घेऊन लिहू म्हणतात अक्षराला अक्षर जुळविता येत नाही परंतु तोच (साईच) जेव्हा स्वतःच्या सामर्थ्याने (स्वसत्ता) लिहवितो तेव्हा लिहिता लिहवीत नाही. जेव्हा जेव्हा अहंभाव (मीपणाचा ताठा) डोकावू पहातो, तेव्हा तेव्हा (साईबाबा) आपल्या हाताने त्याला तळाशी दाबून टाकतात आणि शक्तिपात करून (आपले सामर्थ्य देऊन) शिष्याला कृतार्थ करतात. काया, वाचा व मनाने साई समर्थांना लोटांगणी जाता धर्म, अर्थ, काम व मोक्ष (हे चारही पुरुषार्थ) आपेआप (आपैसे) हाताशी चढतात. कर्म, ज्ञान, योग व भक्ती या चार मार्गांनी (चौमार्गी) ईश्वराची प्राप्ती होते. हें चार मार्ग चार वेगळ्या बाजूंनी (चौबाजू) निघतात तरी ते (सर्व आपणाला) आपल्या ठिकाणी (परमपदाला) पोहचवितात. भक्ती ही बाभूळ वनाची (कांटेरी झाडांच्या रानाची) वाट आहे. कांचा, खळगे (खड्डे) फार बिकट (अवघड) असतात. ती एकपावली (एकेक पाऊल टाकता येईल एवढीच रूंद) पण नीट (सरळ) असते आणि हरिनिकट (परमेश्वराजवळ) घेऊन जाते. काटा टाळून पाय टाकणे हाच सुलभ (सोपा) उपाय आहे. (त्याप्रमाणे केले की) आपले ध्येय (निजधाम) सुरक्षितपणे (निर्भय) गाठाल असे गुरुमाऊलीने स्पष्टपणे (निक्षून) सांगितले आहे. मनरूपी मळे (बागाईत जमीन) जर भक्तिरूपी पाण्याने शिंपडले तर वैराग्य मोकळे होते (खुले), ज्ञानरूपी फुलाचा बहर येतो (फुले), कैवल्याचे (मोक्षाचे) फळ लागते, चित्सुख (ज्ञानमय

आनंद) उफाळून येते आणि जन्ममरण निश्चयाने टाळले जाते (अचूक चुकते). (ओ. १-१८)

परमात्मा स्वयंसिद्ध (स्वतःच पूर्णत्वेला पोहोचलेला) आहे. तोच सत्य, ज्ञान व आनंद युक्त (सत्+चित्+आनंद) असा तीन स्वरूपाचा (त्रिविध) आहे. कारण निमित्ताने (उपाधि योगे) तो भक्तांना (बोध) शिक्षण देण्याकरिता पूर्णपणे जागा (प्रबुद्ध) होऊन प्रकट (व्यक्त) झाला. जसा हा त्रैगुण्ये (सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी) व्यक्त (प्रकट) झाला तशी माया (सृष्टी निर्माण करण्यास साधनीभूत अशी ईश्वराची शक्ती) देखील क्रियाप्रयुक्त (कर्म करण्यास सिद्ध) होऊन सत्त्व, रज व तम या गुणांना चाळविते (हलविते) आणि आपले गुण चांगल्या प्रकारे प्रकट करते. मातीच्या (मृत्तिकेच्या) विशिष्ट आकाराला घडा (घट) हे खरोखर (साचार) नाव असते. परंतु घडा फुटला की नाव, रूप आणि विकार (पदार्थांचे रूपान्तर किंवा बदल) हे सर्व प्रकार निघून जातात. हे सगळे जग मायेपासून (पासाव) उत्पन्न झाले आहे. त्यांचा (जगाचा आणि तिचा) कार्यकारण भाव (हेतु व फल यांचा संबंध) आहे. (खरे म्हणजे) माच प्रत्यक्ष साकार (सावयव) होऊन जगाच्या रूपाने उद्भवली आहे. जगाच्या आधी मायेची स्थिती पाहिली तर ती व्यक्ती नव्हती (तिला आकार नव्हता). परमात्म्याच्या स्वरूपात लीन (एकजीव) झालेली होती आणि परम (श्रेष्ठ) अव्यक्तांत (इंद्रियाला अगोचर अशा स्थितीत) जमा झालेली होती (संचली). व्यक्त (स्वतंत्र अस्तित्व असलेली मनाने व इंद्रियांनी जाणण्याजोगी) झाली तरी परमात्म्याचेच रूप असलेली माया परमात्म्याच्या रूपाहून मुळीच भिन्न नाही. (अभेदरूप परमात्मीं). (ओ. १९-२४)

मायेने तमोगुणापासून (भूतमात्रात असणाऱ्या सत्त्व रज व तम या त्रिगुणांपैकी तिसरा गुण. यापासून मूढत्व, अज्ञान, काम, क्रोध इ. विकार उत्पन्न होतात) जड (हालचाली शिवायचे किंवा जीव नसलेले) पदार्थ निर्माण केले. ही प्रथम क्रिया पूर्ण झाली. मग मायेच्या रजोगुणात (त्रिगुणांपैकी दुसरा गुण. या गुणाच्या प्राबल्याने कामक्रोधादि मनोविकार उत्पन्न होतात) परमात्म्याच्या चिद्गुणाची (चित्-कलेची म्हणजे चैतन्याची) मिळणी (भेट) झाली म्हणजे या दोन्ही गुणांच्या (तम व रज) स्वाभाविक धर्मांमध्ये (गुणी) चैतन्याची खाणच (साठाच) घडली जाते (अनेक प्रकारचे चर प्राणी उत्पन्न होतात). पुढे मायेच्या सत्त्वगुणाने (त्रिगुणांपैकी पहिला गुण. हा सर्व सद्गुणांचा द्योतक आहे. या गुणांच्या उत्कर्षाने शांती, क्षमा, दया इ. गुणांची वृद्धी होते) बुद्धितत्त्व (सारासार विचार करणारी व एखाद्या गोष्टीचे आकलन करणारी मानसिक शक्ती) निर्माण केले आणि त्यात परमात्म्याचा आनंदगुण मिसळला गेला म्हणजे (बुद्धिमान

मनुष्य प्राणी उत्पन्न होऊन) खेळाला संपूर्णता येते. (ओ. २५-२७)

अशाप्रकारे माया महाविकारी (रूप पालटण्यात तरबेज आणि तत्पर) असते परंतु जोपर्यंत रूपान्तराचा त्रास (क्रिया+उपाधि) स्वीकारीत नाही आणि वर सांगितलेले (पूर्वोक्त) पदार्थ (जड पदार्थ, चैतन्यखाणी, बुद्धितत्त्व) उत्पन्न करीत नाही तोपर्यंत हे त्रिगुण (सत्त्व, रज व तम) अव्यक्त (प्रकट न झालेले) असतात. गुणांना अनुरूप (योग्य) अशा क्रिया केल्याशिवाय माया व्यक्त होत (स्पष्ट दिसत) नाही. जोपर्यंत ती क्रिया न करण्याचे धोरण आचरते (सेवी अक्रियत्व) तोपर्यंत ती अव्यक्त राहू शकते हे जाणा (पाही). (एकूण) माया हे ईश्वराचे कार्य आहे. (ईश्वरापासून उत्पन्न झालेली आहे) सर्व खलु इदं ब्रह्म (दिसणारे हे सर्व ब्रह्मच आहे) हे तत्त्व आणि तिघांचे (ब्रह्म म्हणजे परमात्मा, माया व जग) हे ऐक्य ते हेच होय. अशा ऐक्याचा अनुभव (अभेद प्रतीति) निश्चित प्राप्त कसा व्हावा अशा ज्यांचे चित्तात उत्कट इच्छा असेल त्यांनी वेदशास्त्रांचा अभ्यास करावा. ही वेदशास्त्रे व श्रुतिस्मृती सारासार विचार करण्याची, गुरु व वेदांत यांच्या वचनांचा प्रत्यय आणि परमानंद देतात. (ओ. २८-३२)

'माझिया भक्तांचे धामी (घरी)। अन्नवस्त्रास नाही कमी।।'' याबद्दलची (अर्थी) श्री साई खात्री (हमी) देत असत. हे (त्यांच्या) भक्तांना नेहमीच ठाऊक (अवगत) आहे. 'मज भजती जे अनन्यपणें (एकनिष्ठपणे)। सेविती नित्याभियुक्त मनें (नित्य योगयुक्त मनाने)। तयांचा योगक्षेम चालविणे (उदरनिर्वाहाची तजवीज करणे व पाहिजे ते मिळवून देणे)। ब्रीद (व्रत) हे जाणे मी माझे।।' हेच भगवद्गीतेचे वचन **(अनन्याश्चिन्तयन्तोयन्त्वो मां ते जना: पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।** अ. ९ श्लो. २२) प्रमाण (निश्चित खरे) माना असे श्री साई म्हणत असत. (तुम्हा) भक्तांना अन्नवस्त्रांची वाण (कमतरता) नाही. त्यासाठी (उगाच) प्राण खर्ची घालू नका (वेचू नका). लौकिकी (प्रपंचातील रूढ) मानापमानाचा लोभ सोडून द्या आणि देवाच्या घरीच मान मिळवावा, देवापुढेच पदर पसरावा (काकुळतीने मागणी करावी) आणि देवाचाच प्रसाद (अनुग्रह) जोडावा. लोकांनी मान डोलाविली (वाहवा केली) की तितक्याने स्वत:ला विसरला का? (भरसी भुली?) (अरे!) आराध्य देवतेच्या किंवा गुरुच्या अंत:करणांतील मूर्तीला पाझर फुटून ती घामाने डबडबली पाहिजे. हेच ध्येय गोड लागले पाहिजे. सर्व इंद्रियांना भक्तीचे वेड लागले पाहिजे व इंद्रियांच्या क्षुब्ध वृत्तींना (विकारांना) भक्तीचे अंकूर (मोड) फुटले पाहिजेत. मग काय कौतुक (कोड) होईल? सदासर्वदा असेच भजन घडो. इतर काहीही न आवडो. मन माझ्या (साईंच्या) नामस्मरणी जडो आणि इतर सगळ्या (अवघ्या) गोष्टींचा विसर पडो. म्हणजे देह (शरीर), गेह (घरदार), वित्त (धनसंपत्ती) यांचे भान राहणार नाही.

चित्त परमानंदी जडेल आणि मन खात्रीने (निश्चित) तटस्थ (समदर्शी) आणि अगदी शांत (काम क्रोधादि विकार ज्याचे शमले आहेत असे) होऊन तृप्तही (परिपूर्ण) होईल. (ओ. ३३-४०)

सत्संग केल्याची खूण म्हणजे वृत्तीचे समाधान झाले पाहिजे. नाना ठिकाणी जे मन भटकते ते काय सल्लीन (खरोखर एकजीव झालेले) म्हणावे? तेव्हा श्रोत्यांनी लक्ष देऊन (दत्त+अवधान) श्रद्धेने (भावार्थे) पुढील वर्णन (निरूपण) ऐकावे. हे साईचरित्र श्रवण केल्याने मनाची प्रवृत्ती भक्तीकडे वळेल (भक्ति+प्रवण मन). कथेच्या सान्निध्यात (संगती) प्रसन्नता लाभेल. चंचल मनाला विश्रांती लाभेल, तळमळीची निवृत्ती होईल आणि अत्यंत सुखाची प्राप्ती (सुखसंवित्ति) होईल. (ओ. ४१-४३)

आता पूर्वीच्या मशिदीच्या जीर्णोद्धाराच्या अनुसंधानाने रामजन्माच्या कथाकीर्तनाविषयीचे वर्णन पुढे चालवू या. एक भक्त गोपाळ गुंड (मोजणी खात्यात सर्वेअर) होते. त्यांची बाबांवर फार (उदंड) भक्ती होती व बाबांचे सतत (अखंड) नाव घेऊन वेळ घालवीत असत (कालखंडण ये रीती). त्यांना (३ स्त्रिया असून) संतान नव्हते. पुढे साईबाबांच्या प्रसादाने त्यांना पुत्ररत्न झाले. आणि त्यांचे मन प्रसन्न झाले. (एकदा) गोपाळ गुंडाच्या मनात आले की शिरडी गावात दरवर्षी एक यात्रा किंवा उरूस (पिराचा म्हणजे मुसलमान साधूचा किंवा त्याच्या थडग्याचा उत्सव) भरवावा म्हणजे सर्वांना आनंद होईल. तात्या कोते पाटील, रामचंद्रदादा कोते पाटील, माधवराव देशपांडे वगैरे सर्व मुख्य (प्रमुख) मंडळींना हा विचार आवडला (रुचला) आणि (ते) तयारीला लागले. पण या वार्षिक उत्सवाकरिता एका नियमाचे बंधन होते. (त्याकरिता) जिल्हाधिकारी यांची संमती (अनुमोदन) घेणे आवश्यक होते. (परंतु) त्यासाठी प्रयत्न (उद्योग) करू जाता गावातील एक कुलकर्णी (सरकारने आपला वसूल इ. चा हिशेब लिहीण्यासाठी नेमलेला अधिकारी) कुत्सितपणे (नीचपणाने) उलटा (विरुद्ध) गेल्याने कार्यात विघ्न उद्भवले (मोडता आला). कुलकर्णी जो विरुद्ध गेला त्याचा काय परिणाम झाला तो पहा. यात्रा शिरडीत भरू नये असा जिल्ह्याचा हुकूम झाला. परंतु ही यात्रा शिरडीत भरावी असेच बाबांच्या मनात होते. त्यासाठी पूर्ण आशीर्वादयुक्त त्यांची आज्ञाही झालेली होती. गावकऱ्यांनी पिच्छा पुरविला, जीवापाड प्रयत्न केला. आणि अधिकाऱ्यांनी हुकूम फिरविला व सगळ्यांचा मान राखला. तेव्हापासून (शके १८१९ सन १८९७() बाबांच्या संमतीने रामनवमीच्या दिवशी भजनपूजनाच्या समारंभासह, ताशे, चौघडे वाजंत्र्यासह, यात्रा चोहीकडून (चौपासी) आणि भरपूर (गडगंज) येऊ लागली. दरवर्षी दोन नवी निशाणे (ध्वजा-पताका) समारंभपूर्वक मिरवत आणून मशिदीच्या कळसाला बांधली जातात

आणि शेवटी तेथेच रोवली जातात. एक निमोणकरांचे (कै. शंकरराव रघुनाथ देशपांडे उर्फ नानासेहेब निमोणकर, माधवराव देशपांड्याचे चुलते) आणि दुसरे (दुजे) निशाण दामू अण्णांचे (कै. दामोदर रासने. नगरचे कासार जातीचे भक्त) अशी दोन निशाणे थाटामाटात (शिरडी गावातून) मिरविले जाते आणि मग मशिदीच्या कळसाच्या टोकावर (अग्रभागी) फडकत ठेवली जातात. (ओ. ४१-५७)

## ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

*** ''श्री साईलीला'' संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना ''श्री साईलीला''च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या ''श्री साईलीला'' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.**

* ''श्री साईलीला'' वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते. त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

* पत्त्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

* आपल्या पत्त्यात काही दुरूस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी शिरडी कार्यलयाच्या निदर्शनास आणावे.

* ''श्री साईलीला'' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या शिरडी व मुंबई कार्यालयाकडे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो ''श्री साईबाबा संस्थान शिरडी'' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे, ''संदेश के लिए स्थान'' आणि ''भेजनेवाले का नाम व पूरा पता'' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* मनिऑर्डर-पत्रावर नाव-पत्ता लिहिताना तो वाचता येईल, अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

# "माझा देव भोळा फकीर"

माझा देव जगावेगळा, सांब भोळा फकीर
चुरितां त्याचे चरण, बदले ललाटीची लकीर॥

त्रिलोकांत भ्रमंती त्याची, स्कंधी घेऊनी झोळी
भक्तिची भिक्षा जो देई, त्या पापांची होळी
चतुकोराचें भोजन अपुले, भक्ता भरवी खीर॥ माझा देव जगावेगळा


अंगावरती ठिगळे फिरती, हातीं भिक्षापात्र
ओवाळी अंकितावरूनी हिरे-माणके मात्र
ह्या देवाची पूजा बांधली, अतां कुणाची फिकीर॥ माझा देव

ह्या फकिराची शिरडी ग्रामीं असे मशिद माऊली
भवतापाने त्रस्त बांधवा इथेंची हो साऊली
ह्या देवाच्या आशीर्वचने भयग्रस्ता ये धीर॥ माझा देव

नाम जिभेवरी धरिता "साई" पदरी ये पुण्याई
शत्रु-संकट, विघ्ने दुर्घट, नुरती कुठली कांही
सहस्त्रकोटी देवरुप हे, भासे वेडा पीर॥ माझा देव जगावेगळा

अरे नास्तिका, तुला भ्रांत का, कुठे कसा परमेश
शिर्डीपुरीं प्रगटे बघ ईश्वर, घेऊनी माणुस वेष
"माणुस" जेव्हां, देव ठरे हा, नयनीं नाचे नीर॥ माझा देव

- सुरेंद्र देसाई
मुंबई.



# जे जे आपणासी ठावे।
# ते ते इतरांसी शिकवावे।।

- श्री. अ. के. चैतन्य
इन्दौर, म.प्र.

मनी धरावे ते होते। विघ्न अवघेची नासोनी जाते।
कृपा केलीया साईनाथे। प्रचिती येते।।१।।
कलीयुगी तारक। स्वामी साईनाथ एक
त्याचे नाम नित्य गावे। भवसिंधूशी तरावे।।२।।
साईमूर्ती हृदयी ध्याता। पावे मोक्ष सायुज्जता।।३।।
साई वसे जया मनी। तया साई जनी वनी।।४।।

या कलियुगामध्ये मुमुक्षूंना तरून जाण्याचा मार्ग म्हणजे साई-उपासना. दुर्गम-निरस-कठीण असा वाटणारा भवसिंधू तरून जातो. एकदा माझ्या मुलाने प्रश्न केला, ''दादा, या काळात गुरु कोणास करावे; कारण जग इतके पुढे गेले आहे की, खरा साधू कोणता ओळखणे कठीण आहे.'' ''रमेश, साध्या व्यावहारिक गोष्टीत देखील रस्ता कोठे जातो? यासही मार्गदर्शकाची जरूरी असते. व्यावहारिक शिक्षण देण्याच्या बाबतीतही गुरुची गरज लागते. तशीच परमार्थातही गुरुची जरूरी असते. पण गुरु स्वानुभावी, म्हणजे आत्मसाक्षात्कारी असला पाहिजे; तरच तो गुरुपदास योग्य असतो.''

श्री साईसत्चरितात म्हटले आहे–''अविनाशी ईश्वर फक्त गुरुदेवच आहे. बाकी सर्व देव मायिक आहेत.''

''तर मग दादा, साईबाबांनी तर समाधी घेतली, मग त्यांना गुरु केले, तर मार्गदर्शन कसे होईल?''

''याचा खुलासा मी तुला श्री रामकृष्ण परमहंसांनी याबाबतीत जे सांगितले आहे, त्याने करतो. वैद्य तीन प्रकारचे आहेत. एक वैद्याचे सोंग करून लांबूनच रुग्णाची तपासणी करणारा, दुसरा रुग्णाची नाडी पाहून औषधे अशी घ्या, तशी घ्या म्हणून सांगणारा व तिसरा रुग्णाला पूर्ण तपासून योग्य ते औषध त्याच्या घश्यात ओतणारा; असे तीन प्रकारचे वैद्य होत. स्वानुभवी (आत्मसाक्षात्कारी) हा खरा गुरु होय! मार्ग दाखवून अनुभवाचे टप्पे दाखवीत जिवा-शिवाच्या ऐक्याचा अनुभव करून देणारा तोच हा गुरु साईनाथ आहे. अशाच स्वानुभवी गुरुला शरण जाऊन त्यावर पूर्ण निष्ठा

...रून प्रयत्न करीत राहिल्यास आत्मप्रचिती आल्यावाचून राहत नाही.''

''दादा, साईनाथ आता हयात नाहीत, तर ते भक्तांना मार्गदर्शन कसे करतात ?''

''अरे, हृदयशुद्धीच्या आवारात, आनंदाच्या राऊळात श्री साईंवर जो ध्यानामृताचा अभिषेक करतो, तसेच एखाद्या वेळेस भक्तीच्या प्रेमाने, गुरुला आई कल्पून स्तनपानापासून होणाऱ्या सुखाचा अनुभव घेत तो तिच्या अंगावर लोळतो किंवा ज्ञानरूप वृक्षाच्याखाली गुरु हीच कोणी गाय आहे, असे मानून आपण तिच्या पाठीस लागलेले वासरू बनतो, गुरुकृपेच्या स्नेहहृदय उदकांत आपण मासोळी झालो आहो, अशी एखादी भावना करतो, तसेच गुरुला पक्षिणी कल्पून पक्षिणीच्या चोचीवरील चारा आपण घेतो; साईनाथ सर्व रूपांत आहेत, तारक आहेत, असे समजून तू त्यांची कांस धर. म्हणजे मनुष्यरूपात, कोणत्याही स्वरूपात ते तुला मार्गदर्शन करतील.''


''अरे, ज्याप्रमाणे विरहिणी पतिव्रता नेहमी पतीचेच चिंतन करते, त्याप्रमाणे ज्या देशात आपल्या गुरुचे घर आहे, ज्याने आपला सर्व काळ त्यात घालविला, तोच देश त्याच्या मनात नेहमी घोळत असतो.''

''गुरुगृह जिये देशी। तो देशचि वसे मानसी।
विरहिणी का जैसे। वल्लभाते।।

''दादा, मी आता साईनाथ हाच माझा गुरु असा मनात पक्का निर्धार करून, त्यांची मनोभावे आजपासून सेवा करीन व माझ्या मनाची मनोकामना पूर्ण करून घेईन. त्याकरिता जीव जावो अथवा राहो.''

''कोणत्या ना कोणत्या कारणाने बाबा तुला नक्कीच मार्गदर्शन करतील.''

**श्री साईनाम श्वासाप्रमाणे अखंड म्हणावे. जिभेवर नाम, डोळ्यांसमोर रुप, हृदयात प्रभूचे वैभव सतत ठेवा. सांसारिक अडचणीही दूर पळतील.**



# प्राणीमात्रांवरही बाबांची सत्ता उदीने घरातील मुंग्याही बेपत्ता

- श्री. रमेश डी. चव्हाण
नवापूर, धुळे.

''चालती हो, चांडाळणी चालती हो इथून! माझ्यासमोर आलीस, तर धुनीत फेकून राख करीन तुझी! साखर खाऊन खाऊन माजल्यात रांडा. साखर खायची आहे नाही का–साखर खा साखर!'' असं मुंग्यांना उद्देशून साईबाबा म्हणालेत. ज्यावेळी निस्सीम भक्त काशिराम शिंपी यांच्यावर चितळीच्या जंगलात दरोडेखोरांकडून भयानक संकट कोसळले, त्यावेळचे बाबांचे हे बोल. काशिरामाजवळ मुंग्यांना घालावयाची साखरेची पुडी होती, ती सोन्या-चांदीच्या ऐवजाची पुडी समजून बिचाऱ्या दयाळू भक्तावर हल्ला झाला. त्यावेळी द्वारकामाईत बाबांनी आकांडतांडव करून मुंग्यांना आपल्या अंतर्शक्तीने निर्माण केले. बाबांच्या हातचे सटके बसताच सगळी मशिदमाई हादरून गेली. भिंती थरथरा कापू लागल्या. खांब गदगदा हलू लागले आणि चहूबाजूंनी बाबांच्या सभोवती जणू मुंग्यांचा अक्षरश: पाऊस कोसळू लागला. शिरडीतल्या नव्हे, तर साऱ्या ब्रह्मांडातल्या मुंग्या तीन खणी मशिदीत जमा झाल्या.

वरील कथानक श्री साईसत्‌चरितात आले आहे. असाच एक अनुभव थोड्या वेगळ्या स्वरूपात दिवाळी १९८९च्या सुमाराला आला. त्यावेळी चार-पाच महिन्यांपासून आमच्या घरी हजारोंच्या संख्येने लाल मुंग्या झाल्या. त्यांचा उपद्रव वाढू लागला म्हणून त्या घालविण्यासाठी विविध प्रकारच्या पावडरी व औषधांची फवारणी केली; पण मुंग्यांची रांग हटता हटेना. एके दिवशी तर अक्षरश: मुंग्यांनी वैतागवून सोडले. घराच्या छतावरूनही मुंग्या पडू लागल्या. आता मात्र घरातही बसवेना; अंगावर पडू लागल्या, चावू लागल्या, अगदी भंडावून सोडले मुंग्यांनी! पण त्यांचा बंदोबस्त व्हावा म्हणून काही उपाय उरला नव्हता.

अशा आपत्तीच्यावेळी आपले श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांची आठवण होते. त्यांच्या उदीचा अनुभव हजारो भक्तांना मिळाला आहे. बाबांनी आपल्या उदीने प्रत्येक कार्यात त्यांना संरक्षण दिले आहे. निरनिराळे असाध्य रोग बरे करण्यापासून ते भूतबाधा झालेल्या लोकांना महासमंधाच्या मगरमिठीतून सोडविण्यापर्यंत! अशा ह्या उदीने विविध प्रकारचे चमत्कार घडवून आणले आहेत. म्हणूनच मीही ह्या मुंग्या घालविण्यासाठी शेवटचा उपाय उदीचा करण्याचे ठरविले. घरातील सर्वांना सांगितले, आता मी उदी फवारणी करतो आणि भिंतीवर टाकतो. मला माझ्या साईवर पूर्ण

यात्री आहे. तो मुंग्या जमा करू शकतो, तसा हाकलूनही लावू शकतो... ''जय साईबाबा!'' म्हणत उदी टाकली आणि काय चमत्कार म्हणावा, सतावणाऱ्या मुंग्यांचा प्रश्न बाबांनी अगदी चुटकीसारखा सोडवून दिला. एवढंच नव्हे, तर त्या दिवसापासून मुंग्या त्या भिंतीवरून गायब झाल्यात, तो आजपावेतो पुन्हा आल्या नाहीत व पुढेही फिरकणार नाहीत; कारण साईसामर्थ्याशिवाय या जगात कोणतीच गोष्ट घडून येत नाही.

मुंग्यांचा हा अनुभव प्रथमदर्शनी क्षुद्र स्वरूपाचा भासत असला, तरी या अनुभवावरून त्यांच्या सामर्थ्याची कल्पना सहज येते. पंचमहाभूतांवर बाबांनी ज्याप्रमाणे सामर्थ्य प्राप्त केले होते, तद्वतच मुक्या व क्षुद्र जीवांवर त्यांचे सामर्थ्य होते. श्री साईबाबा अंतर्ज्ञानी होते. भक्ताचा हेतू ते जाणत आणि संकटेही दूर करीत. चमत्काराला मी तुच्छ लेखतो; पण साईंच्या अंगी विलक्षण दैवीसामर्थ्य होते, ते आजही पावलोपावली जाणवते. ते सिद्धपुरुष होते. ते देही असूनही देहातीत होते. लौकिकात राहूनही अलौकिकात वावरत होते. जडाचे भान राखूनही जडापलीकडील परतत्वाच्या अनुभूतीने भक्तांना ते आकर्षित आणि म्हणूनच बाबांची आज्ञा सर्वचजण पाळत असतात; मग मनुष्य काय आणि क्षुद्र मुंग्या काय, दोघेही सारखेच.

मशिदीत अवतीर्ण झालेल्या त्या मुंग्यांना पाहता पाहता पंख फुटले आणि एखादी टोळधाड गावावरून उडत जावी, त्याप्रमाणे त्या साऱ्याच्या साऱ्या मुंग्या तेथून क्षणार्धात उडून निघून गेल्या; तद्वत आमच्या घरातील मुंग्याही त्या दिवसापासून निघून गेल्यात.

**एकांतात नाम स्मरताना समोर मूर्ती असावी. त्याने अशांती दूर होईल. यालाच जपसंहित ध्यान म्हणतात. (सबीज ध्यान)**

# भक्ती-महात्म्य

- श्री. मधुसूदन विठ्ठल सामंत
मराठी साहित्य प्राज्ञ
कुडाळ, सिंधुदुर्ग.

आमच्या घरी दररोज दुपारी पूजा करताना एक गुरुचरित्राचा अध्याय व रात्री जेवणापूर्वी श्री साईसत्चरिताचा अकरावा अध्याय नित्य वाचण्याचा अनेक वर्षांपासूनचा प्रघात आहे. पण त्या दिवशी मला काही महत्त्वाचे काम असल्याने मी लिहीत बसलो होतो आणि आमचा धाकटा मुलगा 'शरद' पूजा करायला बसला होता. त्यालाही शाळेत लवकर जायचे होते. तो घाईघाईने पूजा उरकून गुरुचरित्राचा अध्याय वाचू लागला. त्यातल्या एका ओवीने माझे लक्ष वेधून घेतले आणि मी विचारमग्न झालो.

भक्ति करावी दृढतर। गंभीरपणे असावें धीर॥
तरीच उतरीजे पैलपार। इह परत्रीं सौख्य पावे॥

प्रथमदर्शनी सोप्या व साध्या अशा वाटणाऱ्या या ओवीत खूप गुढार्थ भरलेला आहे. या ओवीत भक्तीचे महात्म्य कथन करुन भक्तीचे महत्त्व पटवून दिले आहे.

परमात्मा भगवान श्रीकृष्णांनी हीच शिकवण भगवद्गीतेमध्ये ''मन्मना भवमद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामवैष्यसि सत्त्ं प्रतिजानै प्रियोऽसि मे'' या श्लोकाने दिली आहे.

आपल्या पवित्र धर्मशास्त्रात भक्तीचे नऊ प्रकार सांगितले आहेत; ते असे ''श्रवणं कीर्तनम् विष्णोस्मरणम् पादसेवनं अर्चनम् वंदनम् दास्यं संख्यं आत्मनिवेदनम्.'' या भक्तीच्या प्रकारांपैकी कोणताही एक प्रकार आत्मसात करून अनेक भक्तश्रेष्ठांनी देवाला आपलासा केला आहे.

श्रवण-भक्ती राजा परिक्षिताने अनुसरली. कीर्तन-भक्ती नारदांनी अंगिकारली. भक्त प्रल्हाद स्मरण-भक्ती करीत होता. मारुतीराय दास्य-भक्ती, तर सख्य-भक्ती करून वीर धनुर्धारी पार्थ देवाला प्रिय झाला.

भागिरथी नदीच्या पवित्र दक्षिण तीरावर परीक्षित राजाला भागवत सांगताना शुकमुनी सांगतात–

–''हे परीक्षिता, राधा ही सर्व भक्तश्रेष्ठांची आध्यात्मिक गुरु होती. कारण

तिने भगवंताची मनापासून भक्ती केली व तिने आपले जीवन-सर्वस्व कृष्णाला समर्पण केले.

एकदा राधा कृष्णांच्या दर्शनाला द्वारकेला गेली असता श्रीकृष्णांनी राधेची उत्तम व्यवस्था ठेवण्याबद्दल रुक्मिणीला सूचना दिली. अर्थात्, भगवान श्रीकृष्णांची आज्ञा शिरोधार्य मानून रुक्मिणीने राधेच्या व्यवस्थेत थोडेसुद्धा न्यून राहणार नाही, अशी तिची व्यवस्था ठेवली.

श्रीकृष्णांना रात्री झोपताना रुक्मिणीने प्यायला दूध दिले, तद्वतच राधेलाही दूध दिले. दूध पिताना कृष्णांना गरम वाटले. त्यांचे तोंड थोड्याशा प्रमाणात पोळले. त्याचप्रमाणे राधेनेही दूध घेतले.

काही वेळाने रुक्मिणीने श्रीकृष्णांच्या शयन मंदिरात प्रवेश करून कृष्णांचे पाय चुरायला सुरुवात केली. तेव्हा कृष्णांच्या पायाला सूज आल्याचे तिला भासले, म्हणून रुक्मिणीने अत्यंत काळजीयुक्त स्वरांत कृष्णांना विचारले, ''हे नाथ, आज आपणाला कोणते विशेष श्रम पडल्याने आपल्या पायाला सूज आली?''

भगवंतांनी रुक्मिणीला तात्काळ उत्तर दिले, ''हे महाराणी, तू जे राधेला दूध प्यायला दिलेस, ते खूप गरम होते. ती दूध गरम गरम प्याली. राधा अहोरात्र माझे चिंतन करत असते. माझे चरणकमल तिच्या हृदयात असतात; त्यामुळे माझे पाय त्या गरम दूधाने पोळले व त्यांना सूज आली.

साईबाबांनी हे तत्त्व विशद करताना—

जो जो मज भजे जैशा जैशा भावे।<br>
तैसा तैसा पावे मीहि त्यासी।। असे स्पष्ट वचन दिले आहे.

साईनाथ महाराज हे एक आर्तांची व्यथा, दैन्य, संकटे दूर करणारी महान शक्ती होती. त्यांच्या नामस्मरणानेही दुरिते दूर दूर पळत होती. त्यांची जरासुद्धा झळ बाधत नसे. याची प्रचिती अनेकांना आली आणि आजही येत आहे. त्यामुळे त्यांच्या भजनी खूप लोक लागले.

ज्या ज्या माणसांनी त्यांच्याकडे जशा जशा भावनेने पाहिले, त्यांना ते तसे भासले व त्या सर्वांच्या मनोकामना पूर्ण झाल्या.

साईबाबांचे स्मरण करून कोणाचे अहित किंवा नुकसान झाले, असे कोठेही ऐकायला येणार नाही; किंबहुना, ही अशक्य कोटीतलीच गोष्ट आहे. कारण त्यांनी आपणाला गोड आश्वासन दिले आहे.

''शरण मज आला आणि वाया गेला, ऐसा मज दाखवा दाखवा कोणी।''

संसारात मनुष्य जेव्हा अनेक हाल-अपेष्टा, क्लेश सहन करून हताश होतो, निरुत्साही बनून निष्क्रिय होतो व त्याची 'ना इह ना परत्र' अशी अवस्था होते, तेव्हा त्याला देव आठवतो आणि त्यावेळी सच्चिदानंद प्रभू साईनाथ महाराज आपल्यावर येणाऱ्या दुरितांना दूर हाकलतात. त्यासाठीच हातात सदैव काठी घेऊन ते उभे आहेत, अशी कल्पना करून त्यांची मनापासून भक्तीने आळवणी केल्यास मागेपुढे उभे राहून ते

''माझा जो जाहला काया वाचा मने
त्याचा मी ऋणी सर्व काळ।''

या वचनाची पूर्तता तंतोतंत करीत असतात.

सुरुवातीस नाम एकाग्रचित्ते होणार नाही. पण पुढे ते साधेल. नामस्मरणाच्यावेळी चित्र पुढे ठेवावे. नामावरुन मन हलले तर चित्रावर एकत्रित करा. चित्रावरुन हलले तर नामावर जडवा.

भजनाने नामास सुरुवात करा. पहाटे व रात्री अवश्य नाम स्मरा. पुढे ते अखंड तोंडी वसेल.

# हिंदू धर्मात अंकांचं महत्त्व

- श्री. सतीश चुरी
विरार (पूर्व), ठाणे.

मर्त्य मानवी जीवनात उपासनेला फार महत्त्व आहे. मानवाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी, त्याचे आत्मिक बल वाढण्यासाठी, आध्यात्मिक उन्नती होण्यासाठी, नित्यनेमाने, श्रद्धेने केलेल्या उपासनेचे फळ त्याला आजवर मिळत आलेले आहे. कुणी सगुण साकाराला पूजतो, तर कुणी निर्गुण निराकाराला भजतो.


कृतयुगी "तप", त्रेतायुगी "ज्ञान", द्वापारयुगी "यज्ञ" व कलियुगी "नामस्मरण" ह्या चारही युगांमध्ये नामस्मरणासारखे परमेश्वरप्राप्तीचे सोपे साधन दुसरे नाही. काहीजण ईश्वरनामाचा जप किती झाला, हे समजण्यासाठी जपमाळेचा वापर करतात. या जपमाळेत १०८ मणी असतात. प्रत्येक मंत्राचा जप, म्हणजे अगदी 'राम' नामापासून तो चोवीस अक्षरे असलेल्या 'गायत्री' मंत्रापर्यंत सर्व मंत्रांचा जप या १०८ मणी असलेल्या माळेनेच केला जातो. अशा वेळी कित्येक जप करणाऱ्या लहान-थोरांना शंका येत असेल की, जपमाळेत १०८च मणी का? कमी अथवा जास्त का नाहीत?

आपल्या पूर्वीच्या ऋषी-मुनींनी प्रत्येक गोष्टीची योजना ही विचारपूर्वक व अभ्यासपूर्वक बनविली आहे. पुराणकाळी सर्व सत्ता ऋषी-मुनींच्या हाती होती. ते आपल्या तपोबलावर कोणाही चूक झालेल्या व्यक्तीला शाप देऊ शकत होते. रोगी मनुष्यास ते केवळ कृपाकटाक्षाने खडखडीत बरे करू शकत होते. त्यांनी रचलेले ग्रंथ, ग्रंथांतील अमूल्य तत्त्वे शास्त्रीय दृष्टीकोनांतून अगदी खरी होती.

जप करतानासुद्धा केवळ चार प्रकारच्यांच आसनांवर बसून तो केला, तर त्याचा प्रभाव आपल्या शरीरावर होतो. (१) मृगासन (२) व्याघ्रासन (३) दर्भासन अथवा (४) कांबळ ही ती चार आसनं. तसेच जप करताना मण्याला अंगठा आणि मध्य अंगुली यांचा स्पर्श करुन ह्या बोटांनीच ते मणी फिरवावेत. याँ पाठीमागे फार मोठा उद्देश आहे आणि तो म्हणजे, अंगठा आणि मध्य अंगुली यांच्या संघर्षाने एक विलक्षण अशी विद्युतशक्ती निर्माण होते की, जी शरीरातील रक्त-धमनींद्वारे सरळ हृदयाला प्रभावित करुन मनाला स्थैर्य देते, शांती देते.

**आता माळेत १०८च मणी का, त्याची शास्त्रीय कारणे :-**

(१) प्रकृती विज्ञानशास्त्रानुसार जगात एकंदर प्रमुख २७ नक्षत्रे मानली गेली



आहेत व या प्रत्येक नक्षत्राचे ४ चरण ज्योतिषशास्त्रात मानले जातात. २७ ला ४ चरणांनी गुणल्यावर १०८ ही संख्या येते. म्हणजेच १०८ ही संख्या संपूर्ण जगाचे, ब्रह्मांडाचे प्रतिनिधित्त्व करते.

(२) रात्रंदिवस होणाऱ्या मनुष्यमात्राच्या श्वासांची संख्या २१६०० वेदशास्त्राने संमत केली आहे. या हिशेबाने दिवसभराच्या श्वासांची संख्या १०८०० व रात्रभराच्या श्वासांची संख्या १०८०० होते.

(३) ज्योतिषशास्त्रात संपूर्ण विश्वब्रह्मांडाचे १२ भागांत विभाजन केले आहे, ज्याला आपण 'बारा राशी' म्हणतो. त्याचप्रमाणे ९ ग्रह प्रमुख म्हणून मानले जातात. १२ राशी आणि ९ ग्रहांचा गुणाकार केल्यावर १०८ संख्या येते. तसेच १+०+८ केल्यास बेरीज नऊ येते; शिवाय २+१+६+०+० केल्यास बेरीज नऊ येते, जी की हिंदूधर्मातील एक पवित्र व स्थिर संख्या आहे.

आपल्या शिर्डीच्या साईबाबांनीही आपल्या कृतींतून १०८ व ९ ह्या दोन्ही संख्यांचे महत्त्व पटवून दिले आहे.

दिवाळीचा दिवस होता! 'झिपरी-प्रकरणां'मुळे बाबांनी मनोमन निश्चय केला होता. निश्चय कसला हो! बाबांना निश्चय, संचय, हौस, हट्ट अशांसारख्या परमार्थाला विघातक गोष्टी नव्हत्याच मुळी; परंतु कुलकर्णी ब्राह्मणाला, शिरडीतील इतर मारवाडी वर्गाला, तसेच अखिल जगताला आपल्या दिव्यत्त्वाची व आपल्या दिव्यांची साक्ष देण्यासाठी त्यांनी तयारी केली. एव्हाना संध्याकाळ झाली होती. आज मशिदीत दिवाळी उजवायचीच या निर्धाराने बाबा उठले व गावातील एकमेव वामन कुंभाराकडे गेले, ज्याच्याकडून बाबांनी तरुणवयाचे असताना, आव्याच्या श्रमाशिवाय बनविलेले, म्हणजेच कच्च्या मातीचे घडे घेऊन उरवर जागेवर एक सुंदर बाग निर्माण केली होती. दिवाळीच्या दिवशी बाबा आपल्याकडे आले म्हणून तो हर्षभरीत झाला.

"वामन! पणत्या पाहिजेत!" बाबांनी आपल्या आगमनाचं कारण स्पष्ट केलं.

"घ्या ना! हव्या तेवढ्या घ्या!" वामननं मोठं टोपलं पुढे केलं.

"१०८ दे!" बाबा उद्गारले.

वामनने पटापट १०८ पणत्या मोजून बांधून दिल्या. अर्थात, बाबांनी त्या विकत घेतल्या आणि नंतर आपल्या ईश्वरी-शक्तीवर पाण्याने रात्रभर तेवत ठेवल्या. हे झाले १०८ संख्येचे महत्त्व, बेरीज नऊ होणाऱ्या. भगवद्गीतेचे १८ अध्याय, महाभारताचे १८ पर्व; सर्वांचीच बेरीज नऊ! दैवीशक्ती-अध्यात्म यांची संख्या, आकडेशास्त्रातली

अत्यंत स्थिर संख्या-९.

साईदरबारातही नऊ अंकाला महत्त्व होतं. साईबाबांकडेही भक्तरूपी नवरत्नं होती- (१) म्हाळसापती चिमणाजी नागरे (२) तात्या कोते-पाटील (३) माधवराव देशपांडे (४) गणेश सहस्रबुद्धे (५) गोविंदराव दाभोलकर (६) नानासाहेब चांदोरकर (७) हरी सिताराम दीक्षित (८) हरी विनायक साठे व (९) बापूसाहेब बुटी. शिवाय आपल्या निर्वाणसमयीही साईबाबांनी आपल्याजवळ बाळगलेली नऊ नाणी लक्ष्मीआईला दान केली.


नवरात्राचे नऊ दिवस, अष्टादशभुजादेवीचा उत्सव, नवनाथ, नवकन्यांची पूजा, नवचंडी होम, देवीचा अष्टोत्तरशतनामाचा जप, नवविधा भक्ती, जणू ९ ह्या संख्येने सारे पवित्र चराचरच व्यापून टाकले आहे.

बाबांनीसुद्धा द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी आणि शेवटची नवमीही जाऊ दिली व आपले महानिर्वाण विजयादशमीच्या दिवशी केलं. म्हणजेच नऊ माळांचा, नवरत्नांचा हार पुरा करुनच त्यांनी आपलं शिलंगण साजरं केलं.

(शास्त्रीय कारणे एका लेखावर आधारित आहेत.)

**नामस्मरणाला सात्त्विक वागणुकीची जोड द्यायला हवी. नामस्मरणाने भीति संपते, शांति मिळते, मनोमळ धुवून जातो.**

**नामस्मरणाने तुम्ही आपोआप सद्‌वर्तनी व विरक्त व्हाल. हे सर्व नकळतच होईल.**



# श्री साईबाबांची-शिक्षणपद्धती

- सौ. वैदेही दीक्षित
कर्वे रोड, पुणे.

शब्दज्ञानात पारंगत। तो ब्रह्मानंदे सदा डुलत।
शिष्य प्रबोधनी समर्थ। तो मूर्तिमंत स्वरूप माझे।।

(एकनाथी भागवत, अ. ११, श्लो. १८)

शब्दज्ञानात जो पारंगत आहे, ब्रह्मानंदलहरीत जो सदैव डुलत राहतो व एवढे (सामर्थ्य) असण्याउपरांत जो शिष्यास प्रबोध उपदेशाने जागृत करण्यास शक्तिमान आहे, तो माझे मूर्तिमंत स्वरूप आहे, असे जाण.

आपल्या सर्व शिक्षण संस्थांत जागृत अवस्थेतच शिक्षण देण्यात येते. परंतु ह्या संतांच्या अनादि संस्था आहेत व त्यांची व्यवस्था गुह्य, अप्रकट अशी आहे. श्री बाबांची शिक्षणपद्धती विद्यार्थ्यास जागृत, स्वप्न व समाधी अवस्थेत शिक्षण देण्याची होती. साकार रूपाद्वारेच शिक्षण मिळू शकते, असा जरी सामान्य अनुभव असला, तरी त्यास श्री बाबांचा अपवाद आहे. कारण देह विलीन होऊन महासमाधी घेतल्यानंतरही बाबा अजून त्याच पद्धतीने शिक्षण देतात.

भक्ताप्रती बाबांना अक्षय प्रेम होते. त्यांची शिक्षण पद्धती अंत:करणपूर्वक करूणाप्रेरित आहे. आधुनिक शिक्षकाप्रमाणे ते भाडोत्री किंवा लोभी नव्हते आणि नाहीत. महासमाधी घेतल्यानंतर श्री साईबाबा नाहीत, असे काहींना वाटते; पण श्री बाबा पहिल्याप्रमाणेच सदैव जागृत आहेत.

श्री बाबांचे शिक्षण हे अनुभवसिद्ध आहे. वाट चुकलेल्या, विस्मृती पडलेल्या, अशा आलेल्या प्रत्येक भक्ताच्या कल्याणावर नजर ठेवणाऱ्या बाबांना जीव-शिव ऐक्याच्या तदाकार दशेच्या सर्वज्ञत्वामुळे सांगितल्याशिवायच आलेल्यांची दु:खं, संकटे, पारमार्थिक अडचणी वगैरे समजतात व ते कुठल्या अवस्थेत येणार आहेत, त्याचीही त्यांना पूर्ण कल्पना असते.

त्यांची (भक्तांची) दु:खे, संकटे दूर करून पारमार्थिक अडचणींवर तात्कालिक शक्य उपाय बाबा सुचवितात. एकाचा आकडा घोटणाऱ्याला एकदम नवाचा आकडा शिकविण्याची चूक ते करीत नाहीत. एकाचा पाठ पक्का झाल्यावर नंतर दुसऱ्याचा देऊन हळूहळू, सावकाशीने ते तयारी करून घेतात.

भक्तांनी अडचणींचा पाढा वाचल्याशिवाय त्यांचा उकल करणे, विचारलेल्या शंकांचे निरसन करणे, प्रश्नांची उत्तरे देणे, चुका सुधारणे, बुद्धिभेद केल्याशिवाय उपदेश करणे, कासवीप्रमाणे केवळ निजदृष्टीने (कानात मंत्र फुकून नव्हे) भक्तांना गोड शब्दांत समजाविणे, कधी कधी रागाचा अविर्भाव करुन मार्ग दाखविणे, ही त्यांच्या शिक्षण पद्धतींची मुख्य अंगे होती. स्वतःच्या आचरणाने आत्मसंयमन करणे, आसक्तीचा त्याग करून संसारात विरक्तीने राहणे. कर्म-कर्तृत्वाचा अभिमान सोडणे, स्वधर्माचा व आपल्या वाड-वडिलांचा अभिमान ठेवणे, परमेश्वराचे अस्तित्व मानणे, परमेश्वर, माता-पिता, गुरु, गोमाता, संत-सज्जन, दीन-दुःखी, गरीब ह्या सर्वांवर प्रेम करणे, संत वाङ्मयाचा अभ्यास करण्यास व नित्य मनन, निदिध्यास यांवर भर देणे, या रीती श्री बाबा शिकवीत व अजूनसुद्धा शिकवितात.

रात्रीचा समय भगवत् स्मरण करण्यासाठी आहे, तामसिक निद्रेसाठी नाही, यास अनुसरून बाबा तात्या कोते व म्हाळसापतींना रात्री हलवून जागे करीत होते. बाह्य अवडंबर, फाजील आरामसुखाच्या साधनांच्या ते विरूद्ध होते. काकासाहेब दीक्षितांची कसोटी घेऊन त्यांनी गुरुआज्ञेचे महत्त्व पटवून दिले. अण्णासाहेब दाभोलकर, राधाबाई, रघुवीर भास्कर पुरंदरे यांना गुरुवर निष्ठा व सबुरीचा उपदेश देऊन त्यांनी ते कुठल्याही धर्माचे, संप्रदायाचे किंवा पंथाचे पक्षपाती नव्हते, हे दाखवून दिले. थोडक्यात म्हणजे, "असतो मा सद्‌गमय। तमसो मां ज्योतिर्मय। मृत्योर्मा अमृतं गमय।" हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.

**नामस्मरण करताना अनंत विचार येतील. ते दूर सारा. सत्संग ठेवा. आत बाहेर स्वच्छ रहा. तरच नाम परिणामकारक होईल.**

# जाणा येथे आहे.....

- श्री. दिलीप सावंत
खोपोली, रायगड.

ह्या दुनियेत परमेश्वराची लीला अगाध आहे. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र बाबांनी साऱ्या दुनियेला दिला आणि ज्यांनी तो पाळला, त्यांना हवे ते मिळाले. हे सर्व साईभक्तांना येणाऱ्या अनुभवांवरून दिसून येते. श्री साईंनी अनेक रूपांनी भक्तांच्या इच्छा पूर्ण केल्या आहेत.

श्री साईनाथ हे खरोखरच महान संत होते. ''फकिरी बाणा परि जगाचा राणा,'' असे त्यांचे स्वरुप होते. ''जग माझे राज्य, प्रजा ही लेकुरे साई गुरुवरे सांभाळीले,'' ही खरी त्यांची वृत्ती. ते दयाधन होते. अत्यंत आश्चर्यकारक (विचित्र) लीला असलेल्या संत साईंचे चरित्र व त्यांच्या पवित्र कथा ऐकून कान पावन, शुद्ध करून घेऊ या. ''श्री साईसत्चरित'' हा ५३ अध्यायांचा ग्रंथ वाचल्यास भक्तांच्या सर्व इच्छा फलद्रुप होतात. तसेच भक्तांना नेहमी वाचता येईल, असे दुसरे ''श्री साईलीला'' हे मासिक श्री साईबाबांचा आशीर्वाद व प्रसाद आहे.

''श्री साईलीला'' मासिकात नेहमी दर्जेदार साईसाहित्य असते. तव्हा ''श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे'' हे या मासिकाचे मुख्य उद्दिष्ट सफल होत आहे. शिर्डीला जाण्याचा योग दरवर्षी श्री साईबाबांच्या कृपेनेच होत असतो. बाबांच्या समाधीच्या दर्शनांनी माझ्यासारख्या सामान्य भक्तांच्या जीवनात अमूल्य बदल झाले आहेत. वाईट गुण नाहीसे झाले. चांगले मार्ग मिळाले. नोकरी मिळाली. रहाण्यासाठी खोली, मनाप्रमाणे लग्नकार्य, कुठल्याही कामात अडचण आली नाही. प्रवास सुखाचे झाले. प्रत्येक संकटातून मार्ग चांगले मिळाले. नेहमीचे आजार दूर पळून गेले. ''श्री साईलीला'' मासिकात लेख लिहिण्याची बुद्धी बाबांनी दिली. तसेच, मनाप्रमाणे सर्व महत्त्वाची कामे वेळेवर सुखरुप झाली. हे सर्व श्री साईबाबांच्या भक्तीने करता आले. संत-सहवास व संत-भक्ती हा केवढा दुर्मिळ व मौल्यवान ठेवा ह्या संसारात तुम्हा-आम्हाला मिळाला आहे. ''श्री साईलीला''ची प्रगती, हीच भक्तांची उन्नती, असे मी मानतो. ''जाणा येथ आहे। सहाय्य सर्वांस।'

# साम्यावस्था

साईस्मृतीने काळ कंठिता लाभे साम्यावस्था।
बाह्यजगाची धाव थांबता लाभतसे शांतता॥१॥

नयनातिल या अज्ञानाचे पटल दूर सारता।
ज्ञान उरतसे प्रकाश देण्या अंतरिच्या चित्ता॥२॥

माणुस म्हणुनि जगामध्ये या जीवन आपुले जगता।
मानवतेचे धन अपैसे येते आपुल्या हाता॥३॥

व्यवहारातिल धन विपुल ते त्याचि कायसी कथा।
व्यसन लाविते आणि बाणते अंगी ताठरता॥४॥

विद्येने येतसे मानवा अंगी शालीनता।
नम्रभाव तो अंगी जडता सहज घडे ऐक्यता॥५॥


सद्गुणांचा प्रसार होता लाभे आरोग्यता।
सुदृढतेचे राज्य येता पावतो देश महामान्यता॥६॥

विचार-धन हे अधिक वाढता येते सौभाग्यता।
पुरुष-प्रकृति समानतेने दिसेल जगी चालता॥७॥

विरूनि जातिल भेदभाव अन् जीवघेणी वाच्यता।
कुणा हवी ती वृथा मान्यता पोकळतेची प्रथा॥८॥

प्रेम देवुनि प्रेम घेता वाढे प्रिय चारुता।
प्रेमासंगे ध्येय गाठते ते सागरास सरिता॥९॥

- श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.



# पराधीन आहे जगती, पुत्र मानवाचा

- सौ. शोभा प्र. देशपांडे
आगरकर नगर, पुणे.

मनुष्य जेंव्हा जन्माला येतो, तेंव्हा त्याच्यावरोबरच ''योग आणि भोग'' हेही त्याच्या शेवटपर्यंत त्याला सोबत करतात. चांगले आणि वाईट घडणे, घडविणे, त्याच्या सबंध आयुष्यात ज्या काही घटना घडतात, त्याचे शिल्पकार हेच आहेत. चांगली किंवा वाईट फळे (परिणाम) जी भोगावी लागतात, ती आपल्या कर्मानुसार असतात; त्यालाच कर्मभोग म्हणतात. आणि जे काही घडणार असते, ते अटळ असते; तशी बुद्धीच माणसाला होते, त्याला योग म्हणतात. ते चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारचे असतात.

श्री प्रभू रामचंद्राला, राजा हरिश्चंद्राला, पांडवांनासुद्धा राजवैभवाचा त्याग करून वनवास भोगावा लागला, अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. देवादिकांनासुद्धा भोग चुकला नाही. आपण तर सामान्य माणसे! एवढ्याशा ध्रुवबाळालासुद्धा सावत्र आईचा जाच सहन करावा लागला.

''घडे भोगणें सर्वही कर्मयोगें'', असे समर्थांनी म्हटलेच आहे. जे काही घडते, ते आपल्या कळत नकळत घडत असते; कारण तसे योगच असतात. काही मानसिक, शारीरिक त्रास हा माणसाला काहीना काहीतरी कारणाने होत असतोच; मग तो राजा असो किंवा रंक असो.

ऋणानुबंध, योगायोग, कर्मभोग ह्या गोष्टी किंवा त्यांचे चांगले वाईट परिणाम हे माणसाला आधी कळत नाहीत. जरी कळत असले, तरी जाणूनबुजूनसुद्धा माणसाच्या हातून काही चुका घडतात; कारण त्यांचे परिणाम म्हणजेच ते भोग भोगायचे असतात म्हणून त्याला तशी बुद्धीच होते. आपण म्हणतो, ''विनाशकाले विपरित बुद्धी.''

आपण ज्याला नशीब म्हणतो, ते नशीब म्हणजेच हे ''योग आणि भोग.'' कुठलेही काम चांगले झाले की, माणूस म्हणतो, मी केले, माझ्यामुळे, मी होतो म्हणून झाले आणि वाईट काही घडले की, मनुष्य दुसऱ्याला किंवा नशिबाला दोष देतो; ही तर जगाचीच रीत आहे.

एखादे फूलसुद्धा नशीब घेऊन येते. ''कांही जाऊनी बैसती प्रभुपदीं पापापदा वारिते, एखादे फुटके नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारिते.'' काहींना सुवासिनीच्या डोक्यात जाऊन बसण्याचे भाग्य लाभते, काहींना पायदळी तुडविले जाते. असे फुलांचेसुद्धा

शीव असते.

मनुष्य दुःख, त्रास भोगण्यासाठीच जन्माला येतो. सुखाचे क्षण अगदी थोडेच त्याच्या वाट्याला येतात. पण त्या सुखातूनच दुःख निर्माण होत असते; म्हणजे सुखामागे दुःख लपलेले असते. "सुख पहातां जवापाडे, दुःख पर्वताएवढे," ही म्हण अगदी बरोबर आहे.

चांगले-वाईट ग्रह, साडेसाती, राशी, भविष्य ह्या सर्वांवर विश्वास ठेवणे, म्हणजे एकप्रकारचे तात्पुरते समाधान, आशेवर दिवस काढणे किंवा निराश, दुःखी होणे. "कावळा बसायला आणि ढांपी मोडायला एकवेळ आली," "बोलाफुलाला गांठ पडली," असे क्वचित होते. अपशकून, पायगुण ह्यासुद्धा अंधश्रद्धा आहेत.

"माणसाने सुखामध्ये नाचू नये, दुःखामध्ये खचू नये," जो काही प्रसंग चांगला-वाईट येईल, त्याला धैर्यानेच सामोरे गेले पाहिजे. कविवर्य ग. दि. माडगूळकरांनी म्हटलेच आहे, "पराधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा." परमेश्वर जसे ठेवील, तसे रहाणे प्राप्त आहे.

आयुष्यात त्रास, दुःख कमी होण्यासाठी किंवा हे सर्व सहन करण्यासाठी सहनशक्ती दे! अशी प्रार्थनाच परमेश्वराजवळ करायची. परमेश्वराचे, श्री साईनाथांचे नामस्मरण केल्याने आपल्याला नक्कीच धैर्य, एकप्रकारची सहनशक्ती, विश्वास, मनोधैर्यच लाभेल, असा आत्मविश्वास आहे आणि "श्रद्धा सबुरी" तर आपल्याजवळ आहेच.

॥ ॐ श्री साईनाथाय नमः ॥ हा जप निरंतर नित्यनियमाने करु या.

**मायेचा स्वभाव माहीत आहे कसा तो ? जसे पाण्यावरचे शेवाळ. बाजूला सारा, सारे दूर होऊन जाईल. पण पुनः थोड्याच वेळात आपोआप होते तसे! विवेक करावा, साधुसंग करावा, त्या वेळी जणुकाय काहीच नाही, पण थोड्याच वेळाने विषय वासना येऊन आपले आवरण पसरते.**

**- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**



# भक्ती म्हणजे काय ?

**लोक कल्पना-** भक्ती ही कल्पना सर्वसाधारण भाविक मनुष्य बरीचशी सैलपणे वापरीत असतो. त्यात पुष्कळदा भक्ती म्हणजे काय याचा उलगडा बऱ्याच जणांना झालेला नसतो. एखाद्या देवतेची मूर्ति नित्य सवयीप्रमाणे पूजणे किंवा तिला नमस्कार करणे, फुले षोडशोपचार यांचा वापर करणे म्हणजे भक्ती असा बहुतेकांचा समज असतो. बरीच मंडळी ही पवित्र स्थानाला, तीर्थाला किंवा संतांच्या समाधी स्थानाला दर्शनासाठी जाते व तेथे फुले, चादरी, धूप दीप अर्पण करणे एवढे केल्यानंतर भक्तीच्या दृष्टीने आपण कृत-कृत्य झालो असे बहुतेकांना वाटत असते. 'आम्ही' भक्त आहोत असे सांगताना आपण इतरांहून वेगळे आहोत असा निरर्थक अभिमान या भाविकांकडे असतो. या सर्व गोंधळात पडणाऱ्या संकल्पनांचा अगदी सखोल विचार करणे आवश्यक झाले आहे.

**शुद्ध मन हा पाया-** भक्ती या भावनेचा अर्थ फार सखोल आहे. ही एक भूमिका आहे. वृत्ती आहे. मानसिक अवस्था आहे. तिला बाह्य उपचारांचे किंवा पत्र, पुष्प, फळे आणि तांदूळ यांची आवश्यकता आहेच असे नाही. भक्तीच्या मागे, जगाच्यामागे असलेल्या शक्तीवर अत्यंत श्रद्धा व विश्वास असणे ही एक अत्यावश्यक बैठक आहे असा विश्वास असल्याशिवाय किंवा असा भाव स्थिर झाल्याशिवाय भक्तीला योग्य अशा मानसिक, शारीरिक आणि बौद्धिक बैठक तयार होत नाही. आत्मिक श्रद्धा व विश्वास निर्माण होण्यासाठी माणसाचे मन हे अत्यंत शुद्ध, व्यापक, विशाल व करुणामय असणे आवश्यक आहे.

**श्रद्धा: श्रद्धामय शुद्धमन ही बैठक-** आकुंचित मनोवृत्तीच्या, घातकी व विकृत मनोवृत्तीच्या व्यक्तीच्या अंत:करणात खरी श्रद्धा किंवा विश्वास निर्माण होणे दूरापास्त आहे. अनन्यभाव, आत्यंतिक, उत्कंठ प्रेम आणि सर्वस्व समर्पणाची मानसिक तयारी या गोष्टी फक्त शुद्ध मनाचा, सद्गुणी व निष्ठावंत माणूसच दाखवू शकतो. यासाठी मन, बुद्धी व अंत:करण अत्यंत शुद्ध आणि निर्मळ असणे, ही भक्तीची अत्यावश्यक पार्श्वभूमी आहे, या दृष्टीने आपल्या मनाची कितपत तयारी आहे याचा शोध प्रत्येकाने घेतला पाहिजे आणि मगच स्वत:ला भक्त म्हणविले पाहिजे.


**संसारविन्मुखता प्रभुसन्मुखता-** भक्तीला आवश्यक असलेली ही मानसिक बैठक मागील परिच्छेदात सांगितली. या बैठकीमुळे माणसाचे मन, शरीर, बुद्धी स्वच्छ, सरळ व सतेज राहते व जगात उदात्त विचार, भावना किंवा कृति करावयाचे सामर्थ्य आणि मनोबल प्राप्त होते. ही बैठक असल्यानंतर खऱ्या भक्तीभावनेला खरी सुरुवात

होते. अशा शुद्ध अंत:करणाचा माणूस ज्यावेळी परमेश्वरावर अत्यंत प्रेम करतो, त्यावेळी त्याला जगातील इतर वस्तू, मोह, संपत्ती व आवडी या निरर्थक वाटू लागतात. परमेश्वराच्या ठायी जेव्हा भक्ती निर्माण होते त्यावेळी जगातील इतर गोष्टींबद्दल विरक्ती वाटू लागते. इतर संसारी गोष्टींबद्दल आसक्ती नसणे ही शुद्ध भक्तीची एक आवश्यक वैशिष्ट्य आहे. ज्यावेळी माणसाचे मन आपले स्वारस्य इतर गोष्टींतून काढून घेते, त्यावेळी ते परमेश्वराच्या ठायी स्थिर व एकाग्र होऊ शकते.

असा शुद्ध अंत:करणाचा मनुष्य ज्यावेळी स्थिरपणे, एकाग्रतेने, आंत्यतिक प्रेम भावनेने, काया-वाचा-मनाने परमेश्वराचे स्मरण, चिंतन, मनोजप इत्यादी मार्गाने अनुसंधान करु लागतो व असे अनुसंधान दिवसांतून बराच काळ सतत टिकवितो त्यावेळीच तो खरा भक्त बनतो. संतांनी म्हटले आहे की ''भक्तीं म्हणजे मन आवरणें किंवा मनाचा निर्धार होय.'' हे सत्य आहे. कारण परमेश्वरावर उत्कट श्रद्धा व प्रेम करण्यासाठी मनाच्या वृत्ती व सांसारिक वस्तूंबद्दलचे आकर्षण आवरणे अत्यंत आवश्यक आहे.

**अनन्यभाव-** ज्यावेळी मनुष्य 'मला परमेश्वरा शिवाय दुसरे काही प्रिय नाही' असे मानतो त्यावेळी तो खरा भक्त होतो. मला पैसा पाहिजे, बढती पाहिजे इत्यादी लाभ पाहिजेत म्हणून ज्यावेळी मी परमेश्वराशी नवससायास किंवा वायदे करू लागतो त्यावेळी ती भक्ती ठरत नाही, केवळ बाजार ठरतो. परमेश्वराने जे दिले ते बिनतक्रारी स्वीकारणे, परमेश्वराकडे आणखी नवीन नवीन मागण्या न करणें किंवा भिक्षेकऱ्याप्रमाणे सतत याचनांची झोळी न पसरणे हे खऱ्या भक्ताचे लक्षण होय! आपण किती अंशाने भक्त आहोत; हे तपासून पाहाण्यापूर्वी जगातील या मोहांबद्दल आपल्या मनाच्या प्रतिक्रिया काय होत असतात याचे जर स्वत:च आत्मपरीक्षण केले तर प्रत्येकाला आपली भक्तीपथावरील स्वत:ची प्रगती किंवा किती अंशाने आपण स्वत: भक्त झालो आहोत हे स्वत:सच समजू शकेल.

- एक साईभक्त



# श्री साई शिरडीस येऊन जीवन्मुक्त झाले

- श्री. वि. म. हटवार
रेशीमबाग, नागपूर.

श्री साईनाथ, श्रेष्ठ योगी अवतार-कार्यासाठी शिरडीस आले. योगाभ्यासाने लेखनशक्ती, वक्तृत्वशक्ती आणि विचारशक्ती वाढते. धर्मव्रत करण्यास ग्रहणशक्तीची आवश्यकता असते. ती शक्ती अहंकारापासून मुक्त झाल्याशिवाय लाभत नाही.

बाहेरीं भीतरीं कैवल्य आघवें
वाचे न बोलावे ब्रह्मानंदु
चिरंजीव नामा कंठी धरी प्राण
करी तुझें ध्यान रात्रंदिवस।

श्री साईबाबांना सर्व सिद्धी प्राप्त असून ते अंतर्ज्ञानी होते.

ज्याप्रमाणे श्री रामावतार लोकशासनासाठी, श्रीकृष्णावतार धर्मसंस्थापनेसाठी, त्याप्रमाणे श्री साईअवतार मानवता व लोककल्याणासाठी झाला. आध्यात्मिक पुनर्रचना करण्यास श्री साईनाथाने सुरुवात केली. ते एक धर्मव्रत म्हणून तेवढ्याच निष्ठेने ते करीत. गुरुकृपेने त्यासाठी लागणारी शक्ती त्यांना लाभली होती. शक्तीचे उपासक म्हाळसापती यांनी ते जाणले व साईबाबांचे स्वागत केले. श्री साईंनी कोणत्याही परिस्थितीत स्वत: आनंदात राहून सर्व आतुर शिर्डीनिवासी ग्रामवासियांना आनंद प्राप्त करून दिला. आज संपूर्ण शिर्डी साईमय झालेली दिसते. साईनामस्मरण नियमित करणारा निर्भय होतो. साई संतरूप म्हणजे देवरुप असले, तरी हे ओळखण्याची किमया मात्र खऱ्या भक्तांमध्येच असते. जे ओळखत नाहीत, ते भटकत असतात.

Shri Shirdi Sai Baba Prasannam. Om Shanti Om Shanti Om Shanti

मला अशी अनेक पत्रे येतात; कुणीतरी, ज्याला नाव, गाव काहीच नाही, असा वेडा त्याच्या ३० प्रती काढण्यास सांगतो आणि स्वत:ला साईसेवक म्हणवितो. ही पत्रांची साखळी दक्षिणेत १९५५ पासून सुरु असावी. याला काय म्हणावे? ही वेडी श्रद्धा काय कामाची? आकस्मित धन, लॉटरी मिळाली, तरी ती व्यक्ती पागल होणे संभव असते. अशी प्रथा हितकारक नाही. वेळ चांगल्या कामात घालवणे शक्य असेल, तर अनामिक काहीच करू नका. केवळ साईनामस्मरणाने जन्माचे कल्याण होऊ शकते. असो, एका चांगल्या विचाराने लेख लिहिण्यास सुरुवात केली आणि असाच एक लिफाफा पोष्टमनने हिंमत करून हाती दिला; कारण असे हे नेहमीचे